# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

क्र.एचओ/9659 /लेखा दि. 24.06.2022

**<u>कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी जाहिरात</u>**

**विषय** :- प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती तसेच आरोग्य सेवेचे सार्वत्रिकरण या संकल्पनेच्या अंमलबजावणी बाबत

**संदर्भ** :- MGC/F/6649/21-06-2022

सार्वजनिक खात्यांतर्गत प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती तसेच आरोग्य सेवेच सार्वत्रिकरण या संकल्पनेच्या अंमलबजावणी साठी मा.आयुक्त यांची अनुक्रमे क्र. MGC/F/6649/21-06-2022अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. या अंतर्गत सर्वसामावेशक आरोग्य सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी HBT Clinic सुरू करण्यात येणार आहे. सदर HBT Clinic साठी एम.बी.बी.एस पदवीधारक इच्छुक उमेदवाराकडून कंत्राटी **वैद्यकीय अधिकारी** पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानुसार सदर पदे स्थानिक पातळीवर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून निवडीने भरावयाची असल्याने सदर जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे. नियुक्ती आदेश कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या कार्यलयामार्फत काढण्यात येतील.

कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठीची शैक्षणिक अर्हता व कंत्राटी तत्त्वावरील नियुक्तीच्या अटी / शर्ती / सर्वसाधारण नियम खालील प्रमाणे आहेत.

**शैक्षणिक अर्हता :**

1. उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची "एम.बी.बी.एस." पदवी असणे आवश्यक आहे.
2. उमेदवार महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेकडे (MMC) नोंदणीकृत असावा.
3. सदर उमेदवारास संगणकीय प्रणालीमध्ये रुग्णांची माहिती स्वत: भरावी लागेल त्यादृष्टीने आवश्यक संगणक वापराचे कौशल्य असावे.

**वयोमर्यादा :** उमेदवाराचे वय दिनांक 1st July 2022. रोजी 64 वर्षापेक्षा अधिक असू नये

**कामाचे स्वरुप :-**

- सदर दवाखान्यात नागरिकांकरिता सर्दी खोकला ताप इ. सामान्य आजारांवर तसेच मधुमेह,उच्च रक्तदाब इत्यादी दीर्घ आजारांवर उपचार देणे.
- एक्स-रे, सोनोग्राफी इत्यादी करिता Outsourcing निदान केंद्रावर संदर्भित करणे.
- पुढील तपासणी (Consultant Opinion) करिता HBT Polyclinic मध्ये पाठविणे किंवा अतिरिक्त तपासण्याची आवश्यकता भासल्यास त्यांना पुढील चिकित्सेकरिता नजिकच्या रुग्णालये येथे संदर्भित करणे.

**मानधन :-** या पदांसाठी मानधन Incentive वर अधरित आहे.

- ➢ दरमहा किमान निश्चित मानधन रुपये 70,000/- (अक्षरी रुपये सत्तर हजार मात्र).
- ➢ दर दिवशी रुग्णसंख्या 50 च्या वर गेल्यास प्रती रुग्ण रु.40/- याप्रमाणे अधिक मानधन दिले जाईल. जेणेकरुन जर वैद्यकीय अधिका-यांने दररोज 90 रुग्ण तपासल्यास मासिक मानधन अंदाजे रु. 1,10,000 इतके होईल.

- एका महिन्यात 2,500 किंवा त्यापेक्षा अधिक रुग्ण तपासल्यास  वैद्यकीय अधिकारी यांना रु. 5,000/- अतिरिक्त प्रोस्ताहन मानधन देण्यात येईल

**निवडीची कार्यपध्दती :** प्रतिसादादाखल प्राप्त होणा-या अर्जांची आवश्यक कागदपत्रांसह छाननी करून प्रस्तावित पदांच्या प्रमाणात पात्र उमेदवारांना मुलाखती साठी बोलविण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी:**

1. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही 180 दिवसांकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असेल, 180 दिवसांनी एक दिवसाचा सेवाखंड देऊन काम समाधानकारक असल्यास पूर्ननियुक्ती करण्यात येईल.
2. सदर कंत्राटी तत्वावरील वैद्यकीय अधिकारी या पदावर निवडलेल्या उमेदवारांकडून 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरवर करारनामा घेण्यात येईल. (प्रतिज्ञापत्र)
3. कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांनी सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरील सेवेसाठी सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही, तसेच भविष्यात त्यांना वैद्यकीय अधिकारी या पदावर हक सांगता येणार नाही.
4. ही पदे कंत्राटी तत्वावर भरावयाची असल्याने उमेदवाराला सदर दवाखान्यात 65 वर्षे वयोमर्यादा पर्यंतच काम करता येईल.
5. सदर उमेदवारांसाठी निवासस्थानांची व्यवस्था केली जाणार नाही.
6. सदर उमेदवारांची कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने आवश्यकतेनुसार कोणत्याही दवाखान्यात बदली केली जाईल.
7. संबंधित आस्थापना प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.
8. सदर नियुक्त्या ह्या निव्वळ कंत्राटी तत्वावर असल्याने त्यांना महापालिकेत कायमस्वरुपी तत्वावरील नोकरीचा हक्क असणार नाही.
9. निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती /प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याच निदर्शानास आल्यास त्याची उमेदवारीरद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**अर्ज भरण्याचे ठिकाण :** इच्छुक उमेदावारांने आवश्यक ते कागद पत्रांसह अर्ज एफ/दक्षिण कार्यालय 3,मजला बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल मुंबई ,400012 **एच.बी.टी. पॉली क्लिनिक सेल खोली क्र.49 दि. 24.06.2022 ते 29.06.2022 सकाळी 11 ते संध्याकाळी 5 पर्यंत येथे जमा करण्यात यावा.**

अर्ज हा फॉरमेट प्रमाणे असावा आणि त्यासोबत सर्व आवश्यक ते कागदपत्रांसह असावा अन्यथा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. पात्र उमेदवारांना त्याच्या ई-मेल वर मुलाखतीसाठीची ठिकाण,वेळ व दिनांक कळविण्यात येईल.

सही /-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

## वैद्यकिय अधिकारी या पदाकरिता सादर करावयाचा अर्ज.
## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी
२.५ से.मी. X ३ सें.मी.

१. (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम ) (मराठीत) : -----------------------------------------------------

(ब) वडिलांचे /पतीचे संपूर्ण नांव : ---------------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता ) : ----------------------------------------------------

२. अ)पत्ता (पोस्टल पिनकोडसह) : -----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

ब) दूरध्वनी क्रमांक (एसटीडी क्रमांकासह) भ्रमणध्वनी

क) ई-मेल आयडी [ ]

३. लिंग : पुरुष [ ] स्त्री: [ ]

४. अ)जन्मदिनांक : दिनांक महिना वर्ष

[ | ] [ | ] [ | | | ]

ब) दि.०१/०६/२०२२ रोजी असलेले वय --------------वर्षे ------------महिने ------------- दिवस

५. शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | |
| एम.बी.बी.एस. पदवी | | | | | |
| महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलशी नोंदणीकृत आहे का ? | | | | | |

एम.बी.बी.एस. पदवी परिक्षेच्या सर्व गुणपत्रिका तसेच Attempt Cft. जोडणे आवश्यक आहे.

६. संगणकविषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे/नाही

७. अनुभव (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) :

८.स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता. : ————————————————————

————————————————————

९.अ)उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? होय/नाही.

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

क) उमेदवारा विरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? असल्यास तपशील द्यावा.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी------------------- पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू,

दिनांक : अर्जदाराची सही/-

ठिकाण : (अर्जदाराचे नाव)

सोबत :

1.PHOTO

2.PAN CARD

3.AADHAR CARD

4.PERMANENT MMC REGISTRATION AND MMC RENEWAL

5.MBBS DEGREE CERTIFICATE

6.MBBS PASSING CERTIFICATE

7.INTERNSHIP COMPLETION CERTIFICATE

8.MBBS 3rd YEAR MARK SHEET PART-1 AND PART-2